*मुळा एज्युकेशन सोसायटीचे*

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनई,

ता. नेवासा, जि. अहमदनगर

# राष्ट्रीय सेवा योजना

**स्वच्छता ही सेवा उपक्रमांतर्गत नदी स्वच्छता व प्लॅस्टिकमुक्त अभियान अहवाल**

**दि. ०२/१०/२०१९**

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनई येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मा. पंतप्रधान महोदय यांनी निर्देशित केल्यानुसार स्वच्छ भारत अभियान अंतर्गत व क्षेत्रिय संचलनालय भारत सरकार, पुणे आणि मा. राज्यसंपर्क अधिकारी यांच्या परिपत्रकानुसार ***'स्वच्छता ही सेवा '*** उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त व महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतिनिमित्त दि. ०२ ऑक्टोबर २०१९ रोजी खालील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## १. नदी परिसर स्वच्छता मोहीम

स्वच्छता ही सेवा हे ब्रीद वाक्य घेऊन ०२ ऑक्टोबर २०१९ रोजी सकाळी ८.०० ते १०. ०० या वेळेत एकूण १८० रासेयो स्वयंसेवकांनी शनीशिंगनापूर येथील पानसनाला परिसरातील प्लॅस्टिक पिशव्या, बोटल्स, कागद, पालापाचोळा इत्यादी कचरा झाडून स्वच्छ केला तसेच जमा झालेल्या कचर्याची योग्य विल्हेवाट लावली. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अशोक तुवर रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विठ्ठल दरंदले, प्रा. तुकाराम जाधव व प्रा. शरद औटी हे उपस्थित होते.

## २. प्लॅस्टिकमुक्त अभियान

प्लॅस्टिकमुक्त अभियाना अंतर्गत जनजागृती होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे दि. ०२ ऑक्टोबर २०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता शनीशिंगनापूर गावातून जागृती फेरी काढण्यात आली यात अनेक फलकांसह विद्यार्थ्यांनी प्लॅस्टिकमुक्तीचा संदेश दिला. फेरी नंतर स्वयंसेवकांनी

प्रत्येक घरोघरी व दुकानामध्ये जाऊन प्लॅस्टिकमुक्तिचे अहवान करणारे पत्रके वाटली. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अशोक तुवर रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विठ्ठल दरंदले , प्रा. तुकाराम जाधव व प्रा. शरद औटी हे उपस्थित होते.




पानसनाला परिसर झाडून स्वच्छ करतांना स्वयंसेवक विद्यार्थी नदीतील घनकचरा स्वच्छ करतांना विद्यार्थी




झाडून व फावडीच्या सहाय्याने जमा केलेल्या कचर्यांची विल्हेवाट लावताना स्वयंसेवक विद्यार्थी समवेत रासेयो प्रमुख डॉ. विठ्ठलराव दरंदले , उपप्राचार्यडॉ. अशोक तुवर , प्रा. तुकाराम जाधव व प्रा. शरद औटी





पुजा साहित्य विक्रेत्या दुकानदारांना प्लॅस्टिक मुक्तिचे अहवान करणारे पत्रके वाटतांना स्वयंसेवक विद्यार्थी

मंदिर परिसरातील प्लॅस्टिक बोटल्स व पिशवी स्वरुपातील कचरा जमा करतांना विद्यार्थी